ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4

Total No. of Questions : 26 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 310-M (RS)**

**Code No. : 310-M (RS)**

# ಡಿ.ಎಲ್.ಎಡ್. ಪ್ರಥಮ ವರ್ಷ

# D.El.Ed. FIRST YEAR

# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು (ಕಿ.ಪ್ರಾ.ಶಾ.)

# ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ

# FACILITATING LEARNING ( LPS )

# FIRST LANGUAGE — MARATHI

**(ಪರಿಷ್ಕೃತ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**(Revised Syllabus)**

ದಿನಾಂಕ : 14. 12. 2018 ]

Date : 14. 12. 2018 ]

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60

Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate* [ ]

***सामान्य सूचना :*** i) प्रत्येक उत्तराचे चिंतन करून, संघटन करून लिहीण्यास योग्य व्हावे म्हणुन या पेपरला 3 तास वेळ दिला आहे.

ii) प्रत्येक प्रश्नासाठी ज्या सूचना दिल्या आहेत, त्यानुसार उत्तरे लिहा.

**भाग - I**

I. खालील प्रश्नाना **चार** बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यातील योग्य असे एक उत्तर निवडुन लिहा. प्रत्येक प्रश्नाला एक गुण दिलेला आहे. प्रत्येक प्रश्न सक्तिचा आहे. ( प्रत्येक प्रश्नाला **1** गुण ) :

$10 \times 1 = 10$

1. भाषा विकासाचे हे महत्वाचे केंद्र आहे

(अ) घर

(आ) शाळा

(इ) परिसर

(ई) शेजार-पाजार.

2. श्रावणमासी हर्ष मानसी

(अ) क्षणात येई सर सर शिरवे

(आ) वरती बघता इंद्रधनुचा

(इ) हिरवळ दाटे चोहिकडे

(ई) क्षणात फिरूनी ऊन पडे.

3. आकलन शक्ती वाढविण्यासाठी या स्तरावर बालसाहित्याचा उपयोग होतो

(अ) माध्यमिक स्तरावर

(आ) उच्च प्राथमिक स्तरावर

(इ) प्राथमिक स्तरावर

(ई) यापैकी नाही.

4. मौखिक अभिव्यक्ती म्हणजे हे होय

(अ) बोलणे

(आ) खेळणे

(इ) सांगितलेले ऐकणे

(ई) समजावून घेणे.

5. सामान्य संभाषणात आवश्यक तितक्या भाषा मूल येथे शिकते

(अ) शाळेत

(आ) घरी

(इ) परिसरात

(ई) वर्गात.

6. मुलाला घरची भाषा शिकण्याचे साधन

(अ) खेळ

(आ) रडण्याद्वारे आपळी आवश्यकता इतरांना सांगणे

(इ) थोरांचे मार्गदर्शन

(ई) घरच्या लोकांचे अनुकरण.

7. प्रकटवाचन म्हणजे हे होय

(अ) मौनवाचन

(आ) मुकवाचन

(इ) मुखवाचन

(ई) मनात वाचन.

8. वाचन कौशल्य आत्मसात करण्यास याची ओळख करुन देणे आवश्यक आहे
   (अ) वाक्यांची
   (आ) अक्षर, शब्दांची
   (इ) स्वरांची
   (ई) व्याकरणाची.

9. वाचन कौशल्य आत्मसात करण्यासाठी खालील वाक्ये क्रमवार मांडा
   (अ) शब्दरूपाने वाचन करणे
   (आ) चित्राच्या सहाय्याने वाचन करणे
   (इ) अक्षर रूपाने वाचन करणे
   (ई) वाक्यरूपाने वाचन करणे.

10. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत या वयाच्या सर्व मुलाना प्राथमिक शाळेत प्रवेश आणि उत्तम दर्जाचे शिक्षण दिले जाते.
   (अ) 6 ते 12 वयाच्या
   (आ) 6 ते 14 वयाच्या
   (इ) 8 ते 14 वयाच्या
   (ई) 10 ते 12 वयाच्या.

## भाग - II

II. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहीणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान अर्धे पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **दोन** गुण ) : $5 \times 2 = 10$

11. भाषा शिक्षणातील साहित्याचे महत्व सांगा.
12. माता आणि मातृभूमी यांच्या पंक्तीतच मातृभाषेला महत्व आहे. तुमचे मत मांडा.
13. मुलांना कथा सांगण्याच्या कृती संबंधी खालील अंश क्रमवार मांडा :
   i) मुलांच्या अभिव्यक्तीला मुक्त संधी दिली पाहिजे.
   ii) मुलांनी सांगावयाची कथा इतरांनी ऐकण्याचे वातावरण निर्माण केले पाहिजे.
   iii) मुलाना कथा माहित झाली की नांही याची खात्री करुन घ्यावी.
   iv) मुलांने कथा सांगताना ती बहिरंगाने समाप्त करावी.
14. मौनवाचन आणि प्रकटवाचन यातील फरक सांगा.
15. प्रारंभिक साक्षरता म्हणजे काय ?
16. मुलाच्या घरच्या भाषेतून शाळेतील भाषेत बदल करण्यास शिक्षक या नात्याने तुम्ही काय कराल ?
17. मुलाला घरातून शाळेच्या वातावरणात जमवून घेण्याचे अंश सांगा.
18. समावेशक म्हणजे काय ?

**भाग - III**

III. खालील प्रत्येक प्रश्नाला निवड दिलेली आहे. त्यातोल कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान एक पृष्ठ हवे. ( प्रत्येक प्रश्नाला **5** गुण ) : $8 \times 5 = 40$

19. अ) मातृभाषा शिक्षणाचे शिक्षण प्रक्रियेतील महत्व विशद करा.

**किंवा**

आ) मातृभाषा शिक्षकाजवळ उत्तम शिक्षक होण्यासाठी कोणकोणते गुण असणे आवश्यक आहेत ? ते सांगा.

20. अ) उच्चारदोष म्हणजे काय ? ते कसे निर्माण होतात ? ते स्पष्ट करा.

**किंवा**

आ) भाषण कौशल्य आत्मसात करावयाचे 5 मुद्दे सांगा.

21. अ) प्रकटवाचन करताना कोणकोणत्या बाबी लक्षात घ्यावा लागतात ? तुमचे मत मांडा.

**किंवा**

आ) 'फलक हा शिक्षकाचा खरा मित्र आहे.' या विधानाची चर्चा करा.

22. अ) लेखनाचे विविध प्रकार सांगुन, पत्रलेखनातील महत्वाचे मुद्दे सांगा.

**किंवा**

आ) सुलेखन म्हणजे काय ? त्याची चार वैशिष्ट्ये सांगा.

23. अ) वाचनास अनुकूल अशा कृतीमधील कोणत्याही दोन कृती मुलांच्याकडून तुम्ही कशाप्रकारे करुन घ्याल ? स्पष्ट करा.

**किंवा**

आ) मुलांच्याकडून वाचनाची तयारी करुन घेताना तुम्ही अक्षर, शब्दांची ओळख करून देण्याची कृती कशी करुन घ्याल ?

24. अ) साक्षरतेचा मार्ग सुगम करण्याचे सांगुन, वर्गात चालणारे, त्यावर आधारीत असे एक उदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

आ) मूल आपल्या स्वत:च्या भाषेचे घरच्या भाषेत कसे रूपांतर करते आणि घरची भाषा कशी आत्मसात करते, ते स्पष्ट करा.

25. अ) प्रारंभिक साक्षरतेमध्ये सततपणे मौल्याकन करून त्याचक्षणी उपाय सांगणे महत्वाचे आहे. का ते सांगा.

**किंवा**

आ) उच्चारदोष ( बोलण्यातील ) म्हणजे काय? ते कसे निर्माण होतात ? स्पष्ट करा.

26. अ) सर्व समावेशक वर्गात, संभाषणातील दोष असणाऱ्या आणि दृष्टीदोष असणाऱ्या मुलांना कसे मार्गदर्शन कराल ?

**किंवा**

आ) श्रवणदोष असणाऱ्या मुलांनी वर्गात कशाप्रकारे शिक्षकांच्या अध्यापनाकडे लक्ष दिले पाहिजे ? विवरण द्या.